जनहिताय सर्वदा

महाराष्ट्र शासन
वैद्यकीय शिक्षण विभाग,
९ वा मजला, गो.ते.रुग्णालय संकुल,
लोकमान्य टिळक मार्ग, मुंबई-४०० ००१.

Email ID :- medd.est@gov.in दुरध्वनी क्र.:०२२-२२७१९४८४

क्र.नियुक्ती-०२२४/प्र.क्र.५३/२४/आस्थापना (ई-१५८४३९३) दिनांक: २८ ऑक्टोबर, २०२६

**प्रति,**

**संचालक,**
**माहिती तंत्रज्ञान संचालनालय,**
**मंत्रालय, मुंबई-३२.**

विषयः- संकेतस्थळावर जाहिरात प्रसिद्ध करण्याबाबत..

महोदय,

वैद्यकीय शिक्षण विभागाच्या आस्थापनेवर सामान्य प्रशासन विभागाच्या दि.१०.०६.२०२५ च्या शासन निर्णयातील तरतूदीनुसार सेवानिवृत्त उच्चश्रेणी लघुलेखक-१, कक्ष अधिकारी-२, सहायक कक्ष अधिकारी-२ ही पदे १ वर्षासाठी करार तत्वावर भरण्यासाठी संकेतस्थळावर प्रसिद्ध करावयाच्या जाहिरातीची प्रत सोबत जोडली आहे.

२. तरी प्रस्तुत जाहिरात शासनाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात यावी, ही विनंती.

(धिरेंद्र रामटेके)
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

**प्रत**:- माहितीस्तव अग्रेषित,
कक्ष अधिकारी, सामान्य प्रशासन विभाग (माहिती तंत्रज्ञान), मंत्रालय, मुंबई.

वैद्यकीय शिक्षण विभाग, मंत्रालय करीता शासकीय सेवेतून सेवानिवृत्त झालेले १ उच्चश्रेणी लघुलेखक, २ कक्ष अधिकारी व २ सहायक कक्ष अधिकारी अशा ५ सेवानिवृत्त शासकीय अधिकाऱ्यांच्या सेवा करार पध्दतीने मानधन तत्वावर विवक्षित कामासाठी नामिकासूची करण्याकरीता अर्ज मागविण्यात येत आहेत.

| अ.क्र. | पदाचे नाव | विवक्षित कामाचे स्वरुप | भरावयाची पद संख्या संख्या | वय, अर्हता व अनुभव |
|---|---|---|---|---|
| १ | उच्चश्रेणी लघुलेखक | १. श्रुतलेखन<br>२. अधिकाऱ्यांची दैनंदिनी, बैठका व दौरा कार्यक्रमाचे नियोजन<br>३. नस्ती व टपालांची नोंद ठेवणे | १ | उच्चश्रेणी लघुलेखक पदावरील कामकाजाचा किमान ३ वर्षाचा अनुभव<br>I. मराठी/इंग्रजी भाषेत श्रुतलेखनाचा अनुभव<br>II. अधिकाऱ्यांची दैनंदिनी, बैठका व दौरा कार्यक्रम हाताळण्याबाबतचा अनुभव<br>III. नस्त्या व टपाल संबंधित बाबी हाताळण्याचा अनुभव<br>संगणकाचे ज्ञान, टंकलेखन तसेच प्रशासकीय बाबी व तांत्रिक कामकाजाचा अनुभव असलेल्यांना प्राधान्य<br>वयोमर्यादा:-५८ ते ६५ वर्षे |
| २ | कक्ष अधिकारी | १. अर्थसंकल्प विषयक बाबी<br>२. आस्थापनाविषयक बाबी<br>३. न्यायालयीन प्रकरणे संबंधित बाबी | २ | कक्ष अधिकारी पदावरील कामकाजाचा किमान ३ वर्षाचा अनुभव<br>I. अर्थसंकल्प विषयक बाबी हाताळण्याचा अनुभव<br>II. आस्थापनाविषयक बाबी हाताळण्याचा अनुभव<br>III. न्यायालयीन प्रकरणे संबंधित बाबी हाताळण्याचा अनुभव<br>संगणकाचे ज्ञान, टंकलेखन तसेच प्रशासकीय बाबी व तांत्रिक कामकाजाचा अनुभव असलेल्यांना प्राधान्य<br>वयोमर्यादा:-५८ ते ६५ वर्षे |
| ३ | सहायक कक्ष अधिकारी | १. अर्थसंकल्प विषयक बाबी<br>२. आस्थापनाविषयक बाबी<br>३. न्यायालयीन प्रकरणे संबंधित बाबी | २ | सहायक कक्ष अधिकारी पदावरील कामकाजाचा किमान ३ वर्षाचा अनुभव<br>I. अर्थसंकल्प विषयक बाबी हाताळण्याचा अनुभव<br>II. आस्थापनाविषयक बाबी हाताळण्याचा अनुभव<br>III. न्यायालयीन प्रकरणे संबंधित बाबी हाताळण्याचा अनुभव<br>संगणकाचे ज्ञान, टंकलेखन तसेच प्रशासकीय बाबी व तांत्रिक कामकाजाचा अनुभव असलेल्यांना प्राधान्य<br>वयोमर्यादा:-५८ ते ६५ वर्षे |

१. सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय, दि. १०.०६.२०२५ अन्वये नमूद अटी व शर्तीच्या आधारे नियुक्ती करण्यात येईल. सदर शासन निर्णयानुसार मासिक परिश्रमिक व भत्ते निश्चित करण्यात येतील.

(कृ.मा.प.)

२. करार पध्दतीने आयोगामध्ये नियुक्त केलेल्या व्यक्तींना कोणतेही पदनाम असणार नाही व अर्जित, नैमितिक व वैद्यकीय रजा अनुज्ञेय असणार नाही.

३. नियुक्तीच्या कालावधीत विवक्षित काम पूर्ण करण्याची जबाबदारी करारपध्दतीने नियुक्ती देण्यात आलेल्या व्यक्तीची असेल.

४. करारपध्दतीने नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तींना कोणत्याही प्रकारचे प्रशासकीय/ वित्तीय अधिकार नसतील अशी व्यक्ती कोणत्याही शासकीय पत्र / आदेश यावर स्वाक्षरी करण्यास पात्र असणार नाही. इच्छुक सेवानिवृत्त अधिकाऱ्यांनी त्यांचे अर्ज, शारीरीक व मानसिक या आरोग्याच्या दृष्टीने सक्षम असल्याचे प्रमाणपत्र, आवश्यक त्या शैक्षणिक अर्हता व अनुभवाच्या प्रमाणपत्रासह ही जाहिरात प्रसिध्द झाल्याच्या दिनांकापासून दि ०५.११.२०२६ पर्यंत सादर करावेत.

संपर्क:- आस्थापना, वैद्यकीय शिक्षण विभाग, गोकुळदास तेजपाल रुग्णालय संकुल इमारत, ९ वा मजला, नवीन मंत्रालय, लोकमान्य टिळक मार्ग, मुंबई